वि.दि.दा.क्र.३७/२०२०
नि.क्र.७८

**<u>उलटतपास प्रतिवादींकरीता विधीज्ञ श्री.बी.बी. भाकरे यांच्या वतीने शपथेवर सुरु</u> -**

३१. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत १अ ही मिळकत पंतराज गुरु मुकूंदराज महानूभव यांनी दि.०७/०१/१९६९ रोजी श्री.नानासाहेब गंगाधर खंडागळे यांच्याकडून विकत घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत १अ ही मिळकत पंतराज गुरु मुकूंदराज महानूभव यांची वैयक्तीक मिळकत होती. साक्षीदार स्वतः सांगतात की, पंतराज गुरु मुकूंदराज महानूभव यांनी “पंत” या गादीच्या नावे खरेदी घेतली. पंतराज गुरु मुकूंदराज महानूभव यांनी दावा मिळकत १अ ही पंत या गादीच्या नावे खरेदी केली हे दाखविण्याकरीता आमच्याकडे कागदोपत्री पुरावा आहे. तो कागदोपत्री पुरावा म्हणजे दि.०७/०१/१९६९ रोजीचे खरेदीखत होय. हे म्हणणे खरे आहे की, पंतराज गुरु मुकूंदराज महानूभव हे दि.२६/०३/१९८७ रोजी वारले. हे म्हणणे खरे नाही की, पंतराज गुरु मुकूंदराज महानूभव यांच्या मृत्यूनंतर फेर क्र.९२१०अ हे प्रमाणित झाले व त्या फेरमध्ये नमूद लोकांची नावे पंतराज गुरु मुकूंदराज महानूभव यांचे वारस म्हणून दावा मिळकत १अ ला लागली.

३२. माझ्या वयाच्या १९ व्या वर्षी मी महानूभव पंथाची दिक्षा घेतली. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ हे माझे दिक्षेच्या आधीपासून आश्रमात दिक्षीत शिष्य म्हणून राहत होते. साक्षीदार स्वतः सांगतात की, प्रतिवादी क्र.३ यांनी माझ्या आधी संन्यास घेतला परंतू मी लहानपणापासून आश्रमात राहतो कारण अनिल बाबांनी मला उत्तराधिकारी म्हणून स्विकृत केले होते. अनिल बाबांनी त्यांच्या हयातीमध्ये मी उत्तराधिकारी व्हावे म्हणून तसा कोणताही दस्त लिहून दिले नव्हते. अनिल बाबा यांना त्यांच्या वयाच्या अंदाजे २३-२४ व्या वर्षी महंती मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की, “लिळा चरित्र” हा महानूभव पंथाचा मुख्य ग्रंथ आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या ग्रंथामध्ये महंती नावाचे कोणतेही अध्याय नाही. साक्षीदार स्वतः सांगतात की, “लिळा चरित्र” या ग्रंथामध्ये महंती नावाचे अध्याय नसून आचार्य नावाचे अध्याय आहे.

३३. हे म्हणणे खरे आहे की, अखिल भारतीय महानूभव परिषद या नावाने परिषद आहे. हे म्हणणे खरे नाही की, अखिल भारतीय महानूभव परिषद ही महानूभव पंथाच्या पंत व आचार्य यांनी काय-काय काम करावे याबद्दल मार्गदर्शन करते. हे म्हणणे खरे आहे की, हा दावा दाखल करतेवेळेस दोन्ही दावा मिळकती या कोणत्याही न्यासाचा भाग/विषय नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, हा दावा दाखल करतेवेळेस दावा मिळकत १ब ही प्रतिवादी क्र.३ यांच्या नावावर होती. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत १ब चे नाव ज्यावेळेस "महानूभव आश्रम व शिक्षण संस्था" या न्यासाला लावण्यात आले त्यावेळेस त्या मिळकतीवर माझ्या व्यतिरिक्त प्रतिवादी क्र.३ यांचे देखील नाव होते.

**<u>न्यायालयाची वेळ संपल्यामुळे पुढील उलटतपास तहकूब.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2025.09.23 16:54:11 +0530

(आशिष बि. मरलेचा)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
श्रीरामपुर, जि.अहमदनगर

दिनांक २३/०९/२०२५